राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.३२/का.५,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०१/०४/२०१७

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्राथमिक तपासणीच्यावेळी नामनिर्देशनपत्रातील त्रुटी दूर करण्याची उमेदवारांना संधी देण्याबाबत...

महोदय/महोदया,

माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये राज्यात मोठया प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांनी छाननीमध्ये उमेदवारांची काही नामनिर्देशनपत्रे राज्य निवडणूक आयोगाच्या सध्याच्या सूचनांच्या आधारावर अवैध ठरविली. या निर्णयाविरुध्द व तांत्रिक अडचणींमुळे विहित कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करु शकले नाहीत अशा उमेदवारांनी उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल केल्या. निवडणूक प्रक्रिया सुरु झालेली असल्याने मा. उच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. मात्र, उमेदवारांच्या तक्रारीमध्ये लक्ष घालून निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शक होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने सुधारात्मक उपाययोजना कराव्यात, असे मत व्यक्त केलेले आहे.

२. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, पारंपारिक पध्दतीने नामनिर्देशनपत्र भरताना त्यामध्ये अनेकवेळा चुका अथवा त्रुटी रहात असत. अशा चुका होऊ नये यादृष्टीने राज्य निवडणूक

आयोगाने महाऑनलाईनच्या मदतीने नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी एक संगणकीय प्रणाली विकसित केलेली आहे. नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी विहित करण्यात आलेल्या कालावधीमध्ये केव्हाही इच्छुक उमेदवार संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरु शकतो. याचा फायदा असा आहे की, उमेदवार त्याने भरलेली माहिती अचूक आहे याची खात्री करु शकतो. काही चुका राहून गेल्या असल्यास त्या दुरुस्त करु शकतो व त्यानंतर त्याची प्रिंट घेऊन त्यावर स्वाक्षरी करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र सादर करु शकतो. नामनिर्देशनपत्र भरण्यास उमेदवारांना सहाय्य व्हावे यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक मदत कक्षांची स्थापना करण्यात येते. याव्यतिरिक्त जिल्ह्यातील सेतू, ई-सेवा केंद्र, इ. जास्त क्षमतेची इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी तसेच सायबर कॅफे व सीएफसी (Community Facilitation center) इ. ठिकाणी नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

३. अलिकडेच माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये राज्यात मोठया प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये जवळजवळ सर्व उमेदवारांनी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरुन ती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केलेली आहेत. यावरुन स्पष्ट होत आहे की, नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी विकसित करण्यात आलेली संगणकीय प्रणाली निर्दोष असून तिचा सहजरित्या वापर केला जाऊ शकतो. मात्र असे असूनही काही उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्रातील माहिती भरताना त्रुटी राहून गेल्यामुळे छाननीमध्ये त्यांची नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात आली. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने वरीलप्रमाणे मत व्यक्त केलेले आहे.

४. वरील पार्श्वभूमीवर यापुढे नामनिर्देशनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरताना अपवादात्मक परिस्थितीत काही त्रुटी राहून गेल्यास त्या दूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे आदेशित करण्यात येत आहे :-

(i) इच्छुक उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्राची निवडणूक निर्णय अधिकारी अथवा त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांमार्फत प्राथमिक तपासणी करण्यात यावी.

प्राथमिक तपासणीत लक्षात आलेल्या त्रुटी उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्रुटी दूर करण्याची त्यांना संधी देण्यात यावी. जेणेकरुन नामनिर्देशनपत्रावर उमेदवार, सूचक, अनुमोदक यांनी स्वाक्षरी करावयाचे राहून गेले असल्यास अथवा इतर काही त्रुटी असल्यास त्या दुरुस्त करण्याची संधी मिळू शकेल. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आल्यानंतर त्यामध्ये दुरुस्ती करता येणार नाही. त्यासाठी उमेदवारास नव्याने नामनिर्देशनपत्र दाखल करावे लागेल.

(ii) उमेदवाराने नामनिर्देशनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असल्याने संगणक प्रणालीमध्ये माहिती भरुन त्याचे प्रिंट आऊट घेतल्यानंतर त्यामध्ये काही दुरुस्ती करणे उमेदवारास आवश्यक वाटल्यास त्यांना त्यामध्ये हाताने दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी दुरुस्ती ज्याठिकाणी केली जाईल त्याठिकाणी उमेदवाराने दिनांकित स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अशारितीने हाताने दुरुस्ती केली असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक दुरुस्त्या कराव्यात.

(iii) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी वेबसाईट हँग झाल्यामुळे उमेदवार संगणकीय प्रणालीमध्ये नामनिर्देशनपत्र तसेच शपथपत्रातील माहिती भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊ शकणार नाही याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाल्यास त्यांनी राज्य निवडणूक आयोगाशी तात्काळ संपर्क साधून आयोगाचे निर्देश प्राप्त करुन घ्यावेत

(iv) उमेदवारांना वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची संधी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम वेळेपर्यंतच देण्यात यावी.

५. राज्य निवडणूक आयोगाच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, नागरिकांचा मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागेवरुन निवडणूक लढविण्यासाठी स्त्री उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत तिच्या विवाहापूर्वीच्या नावाने मिळालेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास, नाव जुळत नाही या कारणास्तव त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात

येते. त्यामुळे इच्छुक स्त्री उमेदवारास निवडणूक लढविण्याच्या हक्कापासून वंचित रहावे लागते. याबाबत सूचित करण्यात येते की, विवाहित स्त्रीने नामनिर्देशनपत्रासोबत विवाहापूर्वीच्या नावाने मिळविलेले जात प्रमाणपत्र अथवा जात वैधता प्रमाणपत्र, तिच्या नावात बदल झाल्याच्या पुराव्यासह अथवा नावात बदल झाला असल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केल्यास ते स्विकारण्यात यावे.

६. तरी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात ही विनंती.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( नि. ज वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
सर्व विभागीय आयुक्त
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
निवड नस्ती

D:\MM\Election March April Pattern\Reso.RSK